आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१६ जून २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान
- डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधाच्या विक्रीवर बंदी
- नीट युजी फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर टेलिग्रामच्या वापरावर निर्बंध
- अयोध्येतल्या राम मंदिराला दिल्या जाणाऱ्या देणग्यामधल्या गैरव्यवहाराच्या आरोपांची SIT चौकशी सुरू

**आणि**

- एफ आय एच हॉकी चषक स्पर्धेत भारतीय महिला संघ उपांत्य फेरीत

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना स्लोव्हाकियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार द ऑर्डर ऑफ द व्हाईट डबल क्रॉस फर्स्ट क्लास प्रदान करण्यात आला आहे. स्लोव्हाकियाचे अध्यक्ष पिटर पेलेग्रिनी यांनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या पुरस्काराबद्दल स्लोव्हाकियाचे राष्ट्राध्यक्ष, सरकार आणि तेथील जनतेचे आभार मानले आहेत. हा पुरस्कार १४० कोटी भारतीयांच्या प्रती असलेल्या आदराचं आणि भारत स्लोव्हिकिया यांच्यातल्या मैत्रीच्या बंधाचं प्रतिक असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

स्लोवाकियाचा दौरा पूर्ण करुन प्रधानमंत्री फ्रान्सच्या दिशेनं रवाना झाले आहेत. फ्रान्समध्ये ते जी ७ देशांच्या बैठकीत भाग घेणार आहेत.

**<><><><><>**

डॉक्टरच्या चिठ्ठीशिवाय खोकल्याच्या औषधासह कोणत्याही प्रकारच्या सिरपची थेट विक्री करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. औषधांची गुणवत्ता आणि रुग्णांच्या हिताचा विचार करुन केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं हा निर्णय घेतला आहे. द्रवरुप औषध अर्थात सिरपच्या निर्मितीला आणि विक्रीला कायद्याच्या कठोर

चौकटीत आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अन्न आणि औषध कायद्याच्या ७ व्या नियमातून काढून टाकण्यात आलं असून त्यामुळे त्याची आता थेट विक्री करता येणार नाही. असं मंत्रालयानं जारी केलेल्या सूचनेत म्हटलं आहे. निकृष्ट आणि बाद झालेल्या कफ सिरपची विक्री थांबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

<><><><><>

केंद्र सरकारनं २२ तारखेपर्यंत देशात टेलिग्राम या सोशल मीडिया वेबसाइटच्या वापरावर निर्बंध लादले आहेत. वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी नीट युजी २०२६ ची फेर परीक्षा २१ जून रोजी होणार असल्यानं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं हा निर्णय घेतला आहे. आगामी परीक्षेचा पेपर विकण्याचा दावा करणारे अनेक बनावट आणि लोकांची फसवणूक करणारे संदेश या ॲप झळकत आहेत. अशाच एका प्रकरणात अमदाबाद पोलिसांच्या सायबर विभागानं काही जणांना अटक केली आहे. विविध टेलिग्राम चॅनेलच्या माध्यमातून ते पेपर विकण्याचा दावा करत होते. गेल्या महिन्याभरात त्यांनी विद्यार्थी आणि पालकांकडून सुमारे दीड कोटी रुपये गोळा केल्याचं पोलिस तपासात समोर आलं आहे.

त्यामुळे एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं टेलिग्रामवर निर्बंध लादण्याची शिफारस केली होती. तसंच विविध तपास संस्थांना या अशाप्रकारच्या संदेशांची चौकशी करण्याची विनंतीही केली आहे. आगामी नीट यूजी परीक्षेचा पेपर फुटलेला नसून कुणीही या आमिषांना बळी पडू नये, असं एनटीएनं यापूर्वीच स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नीट फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृह सचिव गोविंद मोहन यांनी काल उच्चस्तरीय आढावा बैठक घेतली. परीक्षेबाबत सुरक्षा आणि इतर तयारीचा त्यांनी आढावा घेतला. सर्व राज्य सरकारांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी आणि केंद्रीय

विभागांनी सुरक्षाविषयक नियमांचं काटेकोर पालन करावं, असे निर्देश त्यांनी दिले. विद्यार्थ्यांचा प्रवास सुकर करण्याची विनंतीही करण्यात आली.

<><><><>

केंद्र सरकारनं डिझेलच्या आणि हवाई इंधनाच्या निर्यातीवरच्या विशेष अतिरीक्त उत्पादन शुल्कात वाढ केली आहे. डिझेलवरचं हे शुल्क प्रति लिटर ५० पैशांनी वाढवून १४ रुपये प्रति लिटर तर विमान इंधनावरचं शुल्क प्रति लिटर ३ रुपयांनी वाढवून साडे बारा रुपये प्रति लिटर झालं आहे. देशांतर्गत वापराच्या पेट्रोल, डिझेलच्या किंमतीत मात्र सरकारनं काहीही बदल केलेला नाही.

<><><><>

अयोध्येतल्या राम मंदिराला दिल्या जाणाऱ्या देणग्या आणि दागिन्यांमधे गैरव्यवहार झाल्याच्या आरोपाचा तपास आज विशेष तपास पथकाने सुरू केला. लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत यांच्या नेतृत्वाखालच्या या पथकात पोलीस महानिरीक्षक किरण एस. आणि अर्थ विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश आहे. या पथकाने काल अयोध्या मंदिराच्या आवाराची पाहणी केली.

राम मंदिराला दिल्या जाणाऱ्या देणग्या आणि दागिन्यांमधे गैरव्यवहार होत असल्याचे आरोप  अनेक दिवसांपासून केले जात होते, त्यामुळे उत्तरप्रदेश सरकारने विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. या प्रकरणी सात दिवसांत प्राथमिक अहवाल आणि पंधरा दिवसांत अंतिम अहवाल सादर करण्याचे निर्देश पथकाला देण्यात आले आहेत.

दरम्यान तपास पथकाला संपूर्ण सहकार्य केलं जाईल, असं राम मंदिर निर्माण समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

<><><><>

काँग्रेस नेते पवनराजे निंबाळकर आणि त्यांच्या चालकाच्या हत्या  प्रकरणाचा निकाल २० जूनला देण्याचा निर्णय विशेष न्यायालयाने आज दिला. निकाल तयार

करण्यासाठी आणखी दोन ते तीन दिवस लागतील असं विशेष न्यायालयाचे न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी सांगितलं. निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांच्या हत्येचा आरोप माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्यावर आहे. ३ जून २००६ ला पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांची कळंबोलीत गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. राजकीय वैमनस्यामुळे पद्मसिंह पाटील यांनी निंबाळकर यांच्या हत्येची सुपारी दिली असा ठपका सीबीआयनं ठेवला होता. या प्रकरणात त्यांना २००९ ला अटक करण्यात आली होती, त्याच वर्षी सप्टेंबर महिन्यात अलिबाग सत्र न्यायालयाने त्यांची जामीनीवर सुटका केली होती. पाटील यांच्यासह लातूर इथले व्यावसायिक सतीश मंदाडे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे माजी अधिकारी मोहन शुक्ला हे या प्रकरणातले सहआरोपी आहेत.

<><><><><>

शिकागो येथील भारतीय दूतावासाच्या प्रांगणात आज स्वामी विवेकानंद यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं आज अनावरण करण्यात आलं. या पुतळ्याचं अनावरण करताना भारतीय राजदूत विनय मोहन क्वात्रा म्हणाले की, स्वामी विवेकानंद यांच्या जागतिक बंधुत्वाचा आणि सेवेचा संदेश आजही मना मनात असून त्यांनी जगभरात वेद आणि योगाचा प्रसार केला.

<><><><><>

ओमानच्या किनारी भागात हल्ल्यात सापडलेल्या एमटी सेट्टबेल्लो जहाजातले २१ भारतीय खलाशी सुखरुप मायदेशी परतले आहेत. ओमानच्या किनारी भागात या जहाजावर काही दिवसांपूर्वी हल्ला झाला होता, यात तीन खलाशांना आपले प्राण गमवावे लागले. हल्ला होताच ओमान सागरी सुरक्षा केंद्राला याची माहिती देण्यात आली, त्यानंतर लगेच बचाव आणि शोधमोहीम सुरू करण्यात आली. यातल्या २१ खलाशांना वाचवण्यात यश आलं, हे सर्व खलाशी

आता भारतात परतले आहेत. भारतात परतण्यापूर्वी ओमानमधल्या भारतीय दूतावासाने या खलाशांशी संवाद साधला आणि त्यांच्या धैर्याचं कौतकु केलं.

<><><><><>

अफगाणिस्तान सरकारने महिलांवरील कारवाई मागे घ्यावी तसंच देशातल्या विविध उपद्रवी गटांचा बंदोबस्त करावा असा ठराव संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत मंजूर करण्यात आला आहे.

अफगाणिस्तानमधल्या हेरत इथं वेशभूषेचे नियम मोडल्याप्रकरणी सरकारने तीस महिलांना अटक केली, या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रात हा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

<><><><><>

एफ आय एच हॉकी चषक स्पर्धेच्या  महिला गटात भारतीय संघाने ६ गुण मिळवून उपान्त्य फेरी गाठली  आहे. न्यूझीलंडमधे ऑकलंड इथं झालेल्या उपान्त्यपूर्व सामन्यात भारताने जपानचा २ विरुद्ध १ गोलने पराभव केला. भारताच्या सलीमा तेटे आणि लालरेमसियामी ने प्रत्येकी एक गोल केला, तर जपानसाठी हिरामित्सु आईने एकमेव गोल केला. भारतीय संघ आतापर्यंत अपराजित राहिला असून गुणतालिकेत  अग्रस्थानी आहे.

पुरुष गटात भारताचा सामना आज जर्मनीबरोबर होणार आहे. स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात भारताला नेदरलँड्सकडून पराभ पत्करावा लागला.

<><><><><>

भारतीय महिला हॉकी संघाची मिडफिल्डर ज्योतीने मंगळवारी एफआयएच महिला स्पर्धेत जपानविरुद्ध आपला १०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. हॉकी इंडियाने याप्रसंगी तिचे अभिनंदन करत तिच्या योगदानाची दखल घेतली. मूळची हरियाणाची रहिवासी असलेल्या ज्योतीने २०१९ मध्ये मलेशियाविरुद्धच्या द्विपक्षीय कसोटी मालिकेतून आंतरराष्ट्रीय

पदार्पण केले. आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ज्योतीने अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. २०२२ च्या बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा ती एक भाग होती.

**<><><><><>**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत केप वर्दे या लहानशा देशानं अतुलनीय खेळाचं प्रदर्शन करत स्पेनसारख्या बलाढ्य संघाविरुद्धचा सामना बरोबरीत सोडवला. दोन्ही संघांना या सामन्यात एकही गोल करता आला नाही. केप वर्देचा ४० वर्षी गोलकीपर वोझिन्पा यांना स्पेनला एकही गोल करण्याची संधी दिली नाही. इराण आणि न्यूझीलंड यांच्यातला सामना देखील २-२ असा बरोबरीत सुटला. बेल्जियम आणि इजिप्त यांच्यातला सामना सुद्धा १-१ असा बरोबरीत सुटला. सौदी अरेबिया आणि उरुग्वे यांच्यातला सामना सुद्धा १-१ असा बरोबरीत सुटला.

**//<><><><><>//**